CMYK

तोतया आयएएस भागवतच्या कारनाम्यांची एटीएससह आयबीकडून चौकशी सुरु; कुलगुरुंसह राजकीय नेत्यांकडून उकळले पैसे >> पान 2

शेतात जाणारे रस्ते होणार सुसाट! राज्य सरकारची 'मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना' काय आहे? >> पान 3

काशी येथे युवावेदमूर्ती देवव्रत रेखे यांना दंडक्रम महाविक्रमादित्य पदवी प्रदान, पंतप्रधानांनी केलं कौतुक >> पान 4

**सुविचार**

एखाद्या गोष्टीची गप्प अवस्था म्हणजे तिच्या नाशाची सुरुवात. – हेन्री फ्रेडरिक ॲमिड


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई


■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 118 ■ गुरूवार, दि. 04 डिसेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




अमिताभ लग्नाला सर्वात मोठी चूक म्हणू शकतात: जया बच्चन म्हणाल्या - ५२ वर्षांपासून एकाच माणसाशी विवाहित आहे

आतील पान

# राज्यात थंडीचा कडाका वाढणार



**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** मोसमी पावसाचा लांबलेला प्रवास आणि त्यानंतर अवकाळी पावसाचा मारा झाल्यानंतर आता थंडीची लाट नागरिकांना सहन करावी लागणार आहे. राज्यात एक नाही तर तब्बल तीन महिने थंडीचा कडाका सहन करावा लागणार आहे. भारतीय हवामान खात्याने तसा इशारा दिला आहे.

नोव्हेंबर महिन्यात कडाक्याच्या थंडीला सुरुवात झाली होती, पण लगेच वातावरणात बदल होऊन किमान तापमानात वाढ झाली. आता पुन्हा गेल्या काही महिन्यांपासून थंडीला सुरुवात झाली आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी या आगामी हिवाळी हंगामात; तसेच डिसेंबर महिन्यात महाराष्ट्रासह मध्य भारतात किमान आणि कमाल तापमान सरासरीइतके किंवा त्यापेक्षा कमी राहण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र खात्याने (आयएमडी) वर्तवला आहे.

यंदाच्या हिवाळ्यात राज्यात थंडीच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यताही भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. हवामान खात्यातर्फे हिवाळ्यातील हवामानाचा अंदाज सोमवारी जाहीर करण्यात आला. यावर्षी महाराष्ट्रासह मध्य भारतात थंडीचा कडाका जाणवण्याचे संकेत भारतीय हवामान खात्याने दिले.

खात्याने दिलेल्या माहितीनुसार, डिसेंबर ते फेब्रुवारी या तीन महिन्यांत मध्य महाराष्ट्र आणि कोकणात किमान तापमान सरासरीच्या दरम्यान, तर मराठवाडा आणि विदर्भात सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. याच कालावधीत राज्याच्या बहुतांश भागांत कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहू शकते.

महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगण, मध्य प्रदेश, गुजरात आणि पूर्व राजस्थान या प्रदेशांत यंदाचा हिवाळा तीव्र राहू शकतो. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश हरियाणा येथे थंडीच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा तीन ते पाच दिवस जास्त राहू शकतात. डिसेंबरमध्ये उत्तर महाराष्ट्रात किमान आणि कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता असून, राज्यात इतरत्र किमान तापमान सरासरीइतके राहू शकते.

या महिन्यात मराठवाड्यात थंडीच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. पूर्व किनारपट्टी, गुजरात, मध्य महाराष्ट्र, कोकणाचा उत्तर भाग आणि बिहार येथे डिसेंबरमध्ये पाऊस सरासरीइतका किंवा त्यापेक्षा जास्त राहण्याची शक्यताही भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे.

देशातील उत्तरेकडे असणाऱ्या पर्वतीय राज्यांमध्ये पुन्हा एकदा तापमानात घट होण्यास सुरुवात झाली असून, थंडीचा कडाका वाढण्यास सुरुवात झाली आहे. जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेशपासून अगदी देवभूमी उत्तराखंडमध्येसुद्धा किमान तापमानाच प्रचंड घट झाल्याने अतीव उंचावरील भागांमध्ये तापमानात मोठी घट आली आहे. तर, मैदानी क्षेत्रांमध्ये पावसाच्या सरींचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. उत्तरेकडे वाढलेल्या या थंडीच्या कडाक्याचा थेट परिणाम महाराष्ट्रावर होत असून, राज्यातही किमान तापमानात घट झाल्याची बाब लक्षात येत आहे.

## बेकायदेशीर लोन ॲप्सविरोधात सरकारचा कारवाईचा बडगा, ८७ ॲप्स ब्लॉक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** डिजिटल फसवणूक आणि बेकायदेशीर ऑनलाइन कर्ज देण्याचा दावा करणाऱ्या, त्या माध्यमातून लोकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या, लोकांना लुबाडणाऱ्या ८७ बेकायदेशीर लोन ॲप्सवर बंदी घालण्यात (ब्लॉक) आली आहे. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ६९ अ नुसार इलेक्ट्रॉनिक व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला लोकांच्या सुरक्षेसाठी, त्यांची फसवणूक होऊ नये यासाठी अशा प्रकारचे ॲप्स ब्लॉक करण्याचे अधिकार आहेत.

लोकसभेत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात कॉर्पोरेट व्यवहार राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी म्हटलं आहे की बेकायदेशीरपणे कर्ज देणारे ८७ ॲप्स आतापर्यंत ब्लॉक करण्यात आले आहेत. कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत अशा प्रकरणांमध्ये सातत्याने तपासणी, बँक खात्यांचं ऑडिट व आवश्यक सर्व प्रकारची कारवाई केली आहे. यामध्ये अशा कंपन्या देखील येतात ज्या ॲप्सच्या माध्यमातून ऑनलाइन कर्ज देणे व घेण्यासह बेकायदेशीर आर्थिक व्यवहार करत होत्या.हर्ष मल्होत्रा यांनी स्पष्ट केलं आहे की कंपनी कायद्यातील तरतुदींचं उल्लंघन झाल्याचं लक्षात येतं तेव्हा सरकारकडून कारवाई करण्यात कुठलीही कसर ठेवली जात नाही. सरकारने नुकतेच बेकायदेशीरपणे कर्ज देणारे ८७ लोन ॲप्स ब्लॉक केले आहेत.

## गोदामातील ईव्हीएममध्ये गडबड करण्यास सरकारला भरपूर वेळ मिळेल- पृथ्वीराज चव्हाणांचा सरकारवर हल्लाबोल

**सातारा/प्रतिनिधी** :नगरपालिका निवडणुकांचे निकाल आता ३ डिसेंबर ऐवजी २१ डिसेंबरला होणार आहेत. सोळा ते सतरा दिवस ईव्हीएमच्या पेट्या गोदामात ठेवल्या जातील. पेट्यांमध्ये काही घालमेल करायची असेल तर सरकारला त्यासाठी भरपूर वेळ मिळेल, असा थेट आरोप काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केलाय.

पेट्यांमध्ये काही घालमेल : नगरपालिका निवडणुकांचे निकाल पुढे ढकलल्याचा न्यायालयाचा निर्णयावर माजी पृथ्वीराज चव्हाण यांची प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ''निवडणूक आयोग किती अक्षम्यपणे काम करतोय ते या घटनेतून स्पष्ट होतंय. निवडणुका पुढे ढकलण्याच्या निर्णयावर मी कालच बोललो.

>> पान २

### महापुरात जमीन खरडून गेली, शेतकऱ्यांचा आक्रोश संपेना

# राज्य सरकारने केंद्राला प्रस्तावच पाठवला नाही

### केंद्रीय कृषीमंत्र्यांनीच दिली माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यात महापुराने शेतकऱ्यांची दैना केली असतानाच तसेच मराठवाड्यामध्ये अवघी जमीन खरडून गेली असताना हतबल शेतकरी अजूनही मदतीच्या प्रतीक्षेत आहे. शेतकऱ्यांचा मदतीसाठी आक्रोश सुरू असतानाच सरकारी पातळीवर मात्र त्यांची अनास्था असल्याचे दिसून आलं आहे.ल केंद्र सरकारनेच दिलेल्या लेखी माहितीमध्ये राज्य सरकारकडून अजूनही मदतीसंदर्भात कोणताच प्रस्ताव गेल्या नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे सरकार निवडणुकीमध्ये गुंग असताना शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिलं का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.**



अतिवृष्टीच्या मदतीबाबत राज्य सरकारकडून केंद्र सरकारला कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव पाठवण्यात आलेला नाही. केंद्रीय कृषिमंत्री यांनी संसदेमध्येच ही माहिती दिली. त्यामुळे अतिवृष्टी झालेल्या क्षेत्रांची माहिती देण्यामध्ये सरकारने गंभीर चूक केल्याचे समोर आलं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मदतीचे काय? असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. राज्यात १४ लाख हेक्टरवर महापुराने अतोनात नुकसान केलं आहे.

>> पान २

## आंध्रप्रदेश दारू घोटाळा : मुंबईतील आणखी दोन सराफांचा आरोपींमध्ये समावेश

**अमरावती/प्रतिनिधी :** वायएसआरसीपी सरकारच्या काळात झालेल्या १ हजार कोटी रुपयांच्या दारू घोटाळ्यात एसआयटीनं आणखी दोन आरोपींच्या नावांचा समावेश केला आहे. याप्रकरणी एसआयटीनं विजयवाडा न्यायालयात मेमो दाखल केला. यामध्ये वायएसआरसीपी सरकारच्या काळात दारू घोटाळ्यात लाच देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारे मुंबईतील ज्वेलर्स बंधू चेतन कुमार पालगोटा (ए-५०) आणि रौनक कुमार पालगोटा (ए-५१) यांची नावं आरोपी म्हणून नमूद करण्यात आली आहेत. मंगळवारी संध्याकाळी एसआयटीनं गन्नवरम विमानतळावर रौनक कुमारला अटक केली. तर चेतन कुमारचा शोध सुरू आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

दारू घोटाळ्याचा तपास करणाऱ्या एसआयटीनं मुंबईतील दोन आरोपींचा नव्यानं समावेश केल्यानं मोठी खळबळ उडाली. 'वायएसआरसीपी सरकारच्या काळात डिस्टिलरीजना सर्वाधिक दारू पुरवण्याची ऑर्डर मिळाली. त्या काळातील सरकारी अधिकाऱ्यांना लाच म्हणून दिले जाणारे पैसे विविध

>> पान २

## साधुग्रामसाठी तपोवनात वृक्षतोडीवर सरकार ठाम? देवेंद्र फडणवीस म्हणाले, दाट झाडांमुळे तिथे...

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पुढील वर्षी नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या तयारीसाठी प्रशासन कामाला लागलं आहे. राज्य सरकारच्या पातळीवरूनदेखील कुंभमेळ्याच्या तयारीवर बारकाईने नजर ठेवली जात आहे. मात्र, याच तयारीचा एक भाग म्हणून नाशिकच्या गर्द झाडी असलेल्या तपोवनात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्याचा मुद्दा सध्या चर्चेत आला आहे. कुंभमेळ्याला येणाऱ्या साधूंच्या मुक्कामासाठी तपोवनातील गर्द झाडी तोडून तिथे साधुग्राम बांधण्याचा निर्णय सरकारी पातळीवरून घेण्यात आला आहे. याला पर्यावरणप्रेमींनी विरोध केला असला, तरी तपोवनात वृक्षतोड करण्यावर सरकार ठाम असल्याचे संकेत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत केलेल्या विधानावरून मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तपोवनाबाबत काय म्हणाले?**

मुंबईत आज ऑरेंज गेट टनेलच्या कामासाठी टनेल बोअरिंग मशीनच्या कामाचं उद्घाटन करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मेट्रो प्रकल्पातील इतर पदाधिकारी उपस्थित होते. उद्घाटनानंतर माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं देताना देवेंद्र फडणवीस यांनी तपोवनातील वृक्षतोडीबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली.

''कुंभमेळा आपल्या सगळ्यांसाठी महत्त्वाचा आहे. तसंच पर्यावरणही महत्त्वाचं आहे.

>> पान २

# तपोवनातील वृक्षतोडीवरून वाद, अजित पवार सयाजी शिंदे यांच्या पाठिशी !

**दैनिक आपला विदर्भ**



**नाशिक/प्रतिनिधी :** आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवनातील वृक्षतोडीवरून उफाळलेल्या वादात आता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उडी घेतली आहे. अभिनेते व देवराईचे प्रणेते यांच्या भूमिकेचे त्यांनी समर्थन केले. झाडं आमची आई-बाप आहेत, त्यांच्यावर हल्ला केला तर गप्प बसणार नाही. नाशिकच्या तपोवनातील एकही झाड तोडू देणार नाही अशी भूमिका अलीकडेच अभिनेते शिंदे तपोवनात भेट दिल्यावर मांडली होती.

कुंभमेळ्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने होत असलेल्या वृक्षतोडीबाबत अभिनेते शिंदे यांनी याआधीही विरोध दर्शवला होता. अलीकडेच त्यांनी तपोवनात भेट दिली. झाडं तोडण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी नाशिककरांची जनभावना समजूत घेतली पाहिजे. तपोवनात काढण्यात आलेल्या निविदा चुकीच्या आहेत. त्यामुळे तपोवनातील झाडं वाचवण्यासाठी नाशिकमध्ये जे आंदोलन, लढा उभा राहिलाय, त्याला माझा पाठिंबा आहे. येथील एकही झाड तुटता कामा नये. ही सगळी झाडं वाचली पाहिजेत असे त्यांनी म्हटले होते.

आपल्या देशाचा राष्ट्रीय वृक्ष वड आहे. हा वृक्ष सर्वात जास्त भारत सरकारनेच तोडलाय. तपोवनात प्रदर्शनी केंद्र सुरू करण्यात येत आहे. त्या दृष्टीने निविदा निघत आहे. महाजन यांनी याबाबत उत्तर द्यावे. ते जबाबदार व्यक्ती आहे. आपली वैयक्तिक दुश्मनी नाही. दुश्मनी झाली तरी त्याने मला फरक पडत नाही असे शिंदे यांनी ठणकावले होते.

>> पान २




### जिल्हा परिषद निवडणुकीची मोठी अपडेट, आरक्षणाच्या मुद्यावर

# राज्य निवडणूक आयोग मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नगर परिषद, नगर पंचायती निवडणुकांचा पहिला टप्पा पार पडला. काही नगर परिषद, नगर पंचायतीच्या निवडणुका २० डिसेंबर रोजी पार पडणार आहे. या निवडणुकांचा निकाल आता २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे. निवडणूक आयोगानं ऐनवेळी घेतलेल्या निर्णयाने जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महापालिकांच्या निवडणूक कार्यक्रमांवर प्रश्न उपस्थित होऊ लागले होते. अशातच आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकीबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.

'मिनी विधानसभा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका कधी होणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्याचे समोर आल्यानंतर निवडणुकीबाबत प्रश्न निर्माण झाले होते. त्यातच नगर परिषद निवडणूक निकाल लांबणीवर गेल्याने जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महापालिकांच्या निवडणुका कधी होणार, यावर चर्चा सुरू झाली होती.

काही जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० पेक्षा जास्त झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाचा




निकाल देताना न्यायालयाने ज्या ठिकाणी आरक्षण ५० टक्क्यांवर गेले आहे, त्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे आरक्षण नव्याने ठरविण्याचे आदेश दिले आहेत. या प्रक्रियेला वेळ लागणार असल्याची चिन्हे आहेत.

सुप्रीम कोर्टात आरक्षण याचिकेवर आता पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार आहे. याच सुनावणीत कोर्ट आदेशही देण्याची शक्यता आहे. राज्यातील ३२ जिल्हा परिषदांपैकी १७ जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली गेली आहे. तर, फक्त १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांचे आरक्षण हे ५० टक्क्यांमध्ये आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून महापालिका निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. सुप्रीम कोर्टाच्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया ही ३१ जानेवारी २०२६ पूर्वी होणं बंधनकारक आहे. त्यामुळे आता आरक्षणाच्या मुद्यांवरून निवडणूक आयोग जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांची निवडणूक दोन टप्प्यात घेण्याची शक्यता आहे.

पहिल्या टप्प्यात आरक्षण मर्यादा न ओलांडणाऱ्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांची निवडणूक पार पडण्याची शक्यता आहे. तर, उर्वरित जिल्हा परिषद, पंचायत समितीची निवडणूक त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात पार पडतील अशीही शक्यता आहे. त्यामुळे एकाच टप्प्यात पार पडणारी निवडणूक दोन टप्प्यात होणार असल्याची चिन्ह आहेत.

CMYK

## विदेशी गुंतवणुकीत भरीव वाढ...

भारताची वाढ निश्चितपणे होत असून, देशातील बेरोजगारीचा कमी झालेला दर आणि थेट विदेशी गुंतवणुकीत झालेली भरीव वाढ त्यावर शिक्कामोर्तब करणारी ठरली आहे. महाराष्ट्राने गुंतवणुकीत देशात बाजी मारली असून, देशाच्या विकासातील आपले योगदान पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेबद्दल बोलताना देशातील बेरोजगारीचा दर हा आजवर चर्चेचा आणि चिंतेचा प्रमुख विषय असे. २०१७-१८च्या सुमारास अनेक अर्थतज्ज्ञांनी देशातील बेरोजगारीची पातळी ही ऐतिहासिक उंचीवर असल्याचे म्हटले होते. मात्र, गेल्या सहा वर्षांत याबाबत आश्वासक बदल झाल्याचे दिसून येते आहे. ताज्या आकडेवारीनुसार, देशाचा बेरोजगारी दर सहा टक्क्यांवरून ३.२ टक्के एवढ्या कमी पातळीवर आला आहे. याच वेळी, एप्रिल-सप्टेंबर या महिन्यांत भारतात येणारी थेट विदेशी गुंतवणूकही तब्बल १८ टक्क्याने वाढून, ३५.१८ अब्ज डॉलर्स एवढ्या उच्चांकी पातळीवर पोहोचली आहे. विशेष म्हणजे अमेरिकेतून येणारी गुंतवणूक दुपटीने वाढून, ती ६.६२ अब्ज डॉलर्स झाली आहे. हे दोन्ही घटक एकमेकांना पूरक असेच. तथापि, हा बदल आकडेवारीपुरता आहे का? की, यामागे आर्थिकव्यवस्थेत झालेले सकारात्मक परिवर्तन कारणीभूत आहे, याचा ऊहापोह व्हायलाच हवा. भारतातील रोजगारस्थितीचा मागोवा घेतला, तर २०१७-१८ या काळात बेरोजगारी सुधारण्याची शयता कमी होती. मात्र, आज सहा वर्षांत बेरोजगारीचा दर जवळपास निम्म्यावर आला आहे. सहा टक्क्यांवरून तो ३.२ टक्के इतका कमी झाला आहे. याचाच अर्थ, आज देशातील युवकांच्या हाताला काम मिळते आहे. हा बदल घडण्यामागे देशातील वाढते उत्पादन, सेवा, डिजिटल अर्थव्यवस्था, याचबरोबर ग्रामीण भागातील क्रियाशीलता असे सर्व घटक कारणीभूत ठरले आहेत. ग्रामीण भागात घडून आलेला बदल हा अत्यंत सुखावणारा असाच असून, देशातील वाढत्या पायाभूत सुविधांच्या निर्माणामुळे शहरी-ग्रामीण हा भेदही कमी होत आहे. देशाच्या सर्व भागांत विकास होत असल्याचेच ते द्योतक आहे. अनौपचारिक अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या देशाच्या ग्रामीण भागात रोजगार वाढणे, ही खूप मोठीच बाब ठरली आहे. ग्रामीण उद्योग, कृषीसंबंधित पुरवठा साखळी, बांधकाम, स्वयंरोजगार आणि उद्योजकता या सर्व घटकांनी, ग्रामीण रोजगारनिर्मितीला चालना दिली. शहरांमध्ये तंत्रज्ञानआधारित सेवा, ई-कॉमर्स, लॉजिस्टिक, हेल्थकेअर, फिनटेक, डिजिटल मार्केटिंग आणि विविध नवोद्योग, यामुळेही कामांच्या संधी वाढल्या आहेत. भारत जगातील सर्वात मोठ्या कामगार बाजारांपैकी एक असून, तंत्रज्ञान व सेवाक्षेत्रातील होत असलेला विस्तार, तरुणांसाठी नव्या संधी देणारा ठरत आहे. विशेषतः पायाभूत सुविधांची वेगाने होत असलेली उभारणीही रोजगारनिर्मितीत भर घालत आहे. महाराष्ट्राचा आर्थिकविकास हा देशासाठी नेहमीच दिशादर्शक राहिला आहे. महाराष्ट्रातील बेरोजगारी दर २०१७-१८ मध्ये ४.८ टक्के इतका होता, आता तो ३.३ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. म्हणजेच, देशाबरोबरच राज्यातील परिस्थितीमध्येही मोठी सुधारणा घडून आली आहे, ही दिलासादायक अशीच बाब. ग्रामीण-शहरी अशा दोन्ही भागांत सुधारणा होत असून, ग्रामीण बेरोजगारी जवळपास ३.२ टक्क्यांवरून २.१ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. त्याच वेळी, शहरी बेरोजगारी ७.४ टक्क्यांवरून ५.२ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. ही सुधारणा हे दर्शवते की, रोजगारवृद्धी एका विशिष्ट भागापुरती मर्यादित नसून, ती सर्वदूर होताना दिसून येते आहे. महाराष्ट्रात विक्रमी संख्येने आलेली थेट विदेशी गुंतवणूक, ही रोजगारनिर्मितीचा एक महत्त्वाचा घटक ठरली आहे. उद्योग, उत्पादन, वाहननिर्मिती, डिजिटल सेवा, वित्त, नवीकरणीय ऊर्जा या सर्व क्षेत्रांत वाढत्या गुंतवणुकीमुळे नोकऱ्यांची निर्मिती होत आहे. एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यांत भारतात आलेली ३५.१८ अब्ज डॉलरची गुंतवणूक, जागतिक गुंतवणूकदारांच्या भारतावरील विश्वासाचे प्रतीक ठरली आहे. विशेष म्हणजे, हा प्रवाह १८ टक्के इतका वाढला असून, अमेरिकेतून आलेली गुंतवणूक दुपटीने वाढली आहे. देशात येणारी प्रत्येक गुंतवणूक नवीन रोजगार, नवीन तंत्रज्ञान आणि स्थानिक अर्थव्यवस्थांना नवी ऊर्जा देणारी ठरते आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने गुंतवणूक आकर्षित करणाऱ्या अनेक सुधारणा केल्या. यात थेट विदेशी गुंतवणुकीसाठीचे नियम सुलभ केले गेले. तसेच, अनेक क्षेत्रांत १०० टक्के 'एफडीआय' ऑटोमॅटिक रूटद्वारे उपलब्ध केला गेला. सरकारच्या 'पीएलआय' योजनेने याला अधिक चालना दिली. मोबाईल उत्पादन, औषधनिर्मिती, इलेट्रॉनिस, ड्रोन, ऑटोमोबाईल्स अशा अनेक उद्योगांत 'पीएलआय'मुळे उत्पादन, तसेच रोजगारवाढीचे मोलाचे काम केले. नवीन उद्योग उघडण्याची प्रक्रिया, रजिस्ट्रेशन, कर नियम, ई-गव्हर्नन्स या सर्वांमध्ये सकारात्मक बदल झाल्यामुळे, गुंतवणूकदारांना भारत अधिक सोयीस्कर वाटू लागला. पायाभूत सुविधांवरील होणारी विक्रमी गुंतवणूकसुद्धा, याला कारण ठरत आहे. बुलेट ट्रेन्सपासून महामार्ग, मेट्रो, औद्योगिक कॉरिडॉर्स, डिजिटल ईकोसिस्टम व्यवसाय सुलभीकरणासाठी मदत करत आहेत. ही सर्व धोरणे एकत्रितपणे भारताला गुंतवणूकदारांसाठी आकर्षक पर्याय बनवत आहेत. बहुतेकवेळा, रोजगारातील सुधारणा आणि विदेशी गुंतवणूक यांचा थेट संबंध दिसत नाही. तथापि, भारताच्या बाबतीत या दोन्ही गोष्टी हातात हात घालून चालत आहेत, असे म्हणता येते. गुंतवणूक वाढली, उत्पादन वाढले, बाजार वाढला, सेवाक्षेत्र वाढले आणि त्यातूनच रोजगार वाढल्याचे दिसून येते. म्हणजेच, ही वाढ केवळ आकड्यांपुरती नाही, तर अर्थव्यवस्थेतील एक लक्षणीय सकारात्मक चक्र सुरू झाले आहे. आता प्रश्न हा आहे की, ही सुधारणा टिकवून कशी ठेवायची? नवीन उद्योग आणि तंत्रज्ञानासाठी प्रशिक्षित कामगार आवश्यक आहेत. यासाठीच सरकार कौशल्यविकसाचे कार्यक्रम राबवत आहे. भारतीय रोजगार संरचनेचा कणा असलेल्या लघू व मध्यम उद्योगांना अधिक समर्थन दिल्यास, रोजगार मोठ्या प्रमाणात वाढू शकतात. ग्रामीण उद्योगांसाठी आज सक्षम अशा पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येत आहेत. वेअरहाऊस, ग्रामीण उद्योग लस्टरमुळे ग्रामीण रोजगार मोठ्या प्रमाणात वाढतील. घरातून काम करणे, कौशल्य प्रशिक्षण, उद्योजकता कर्ज यांच्यामार्फत महिलांचाही उत्पादन क्षेत्रातील सहभाग वाढवता येईल. देशातील सरकारचे धोरण सातत्य आणि राजकीय स्थिरता गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढवत आहे. भारतातील बेरोजगारीत झालेली घसरण आणि विदेशी गुंतवणुकीत झालेली वाढ, हे देशाच्या आर्थिक प्रवासातील अत्यंत महत्त्वाचे टप्पे आहेत. देशातील बदलत्या कामगार बाजाराचा तो सकारात्मक संकेत आहे. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये रोजगारात झालेली सुधारणा हेच दाखवते की, आर्थिकवाढ सर्वसमावेशक होत आहे. भारत आज एका महत्त्वाच्या वळणावर असून, येणारी काही वर्षे हे ठरवतील की, हा बदल दीर्घकालीन परिवर्तनात बदलतो की, तो केवळ आकडेवारीपुरता मर्यादित राहतो. भारताची आर्थिक गाथा नव्याने लिहिली जात असून, आता ती विकासाच्या नव्या शिखराकडे जोमाने वाटचाल करत आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही.

# तोतया आयएएस भागवतच्या कारनाम्यांची एटीएससह आयबीकडून चौकशी सुरु; कुलगुरूंसह राजकीय नेत्यांकडून उकळले पैसे

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : तोतया महिला आयएएस अधिकारी कल्पना भागवतचे नवे कारनामे समोर आले आहेत. तिनं माजी कुलगुरूंचा विश्वास कमवून पैसे उकळले. इतकंच नाही तर राजकीय नेत्यांना राज्यसभेचे तर कोणाला पद्मश्री मिळवून देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

कल्पना भागवत या तोतया महिला आयएएस अधिकाऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे. तपासात कल्पना भागवतनं वेगवेगळ्या पद्धतीनं अनेकांची फसवणूक केल्याची माहिती समोर आली आहे. ही तोतया महिला आयएएस अधिकारी भागवत सहा महिने पंचतारांकित हॉटेलमध्ये राहत होती. तिच्या बाबतीत संशयास्पद गोष्टी उघडकीस आल्यानं तिची चौकशी सुरू करण्यात आली होती. तिचा दिल्ली बॉम्बस्फोटाशी संबंध असल्याचा संशय वर्तवण्यात येत आहे. तिच्या खात्याचा तपशील तपासला जात असताना वेगवेगळी माहिती समोर येत आहे. कल्पना भागवतची एटीएस, आयबीसारख्या तपास यंत्रणा चौकशी करत असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी यांनी दिली.

माजी कुलगुरूकडून घेतले पैसे- कल्पना भागवतचा तपास सुरू असताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शहाबुद्दीन पठाण यांची फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे. या प्रकरणी डॉ पठाण यांची सिडको पोलिसात मंगळवारी चौकशी करण्यात आली. या चौकशीमधील माहितीनुसार तिनं आयएएस अधिकारी म्हणून शहाबुद्दीन पठाण यांची भेट





घेतली. या भेटीत तिनं अनेक जणांच्या ओळखी सांगितल्या होत्या. त्यामुळे तिच्यावर विश्वास बसल्याचं माजी कुलगुरू डॉ. शहाबुद्दीन पठाण यांनी सांगितलं. तिनं काही पैसे घेतल्याचा जबाब डॉ पठाण यांनी मंगळवारी रात्री दिला. पोलिसांकडून मंगळवारी रात्री अकरापर्यंत त्यांची चौकशी सुरू होती.

राजकीय नेत्यांची फसवणूक- तोतया आयएएस अधिकारी भागवत हिनं अनेक राजकीय मंडळींना फसवलं असल्याचं तपासात उघड झालं आहे. शिवसेनेचे (उबाठा) हिंगोलीचे खासदार नागेश पाटील अष्टेकर यांचीदेखील एक लाखांची फसवणूक केल्याचं उघड झालं आहे. याप्रकरणी खासदार अष्टीकर यांनीदेखील दुजोरा दिला आहे. सदरील महिला मझ्याकडे अधिकारी म्हणून आली होती. आपण राजकीय नेते आहात, असे सांगत एका मंदिरासाठी एक लाख रुपयांची मदत मागितली. ती मदत केल्याचं खासदार अष्टेकर यांनी सांगितलं. स्थानिक पोलिसांनी तिच्या संपर्कात असलेल्या केंद्रीय मंत्र्यांचा ओएसडी म्हणून मिरवणारा डिम्पी देवेंद्रकुमार हरजाई आणि तिचा अफगाणी मित्र अशरफची कसून चौकशीला सुरुवात केली आहे. तिघे संपर्कात कसे राहायचे? किती वेळा भेटले? अशरफनं त्याचा भाऊ गिल याला कल्पनाच्या संपर्कात का आणले? त्यामागे त्याचा उद्देश काय होता? या प्रश्नांची उत्तर तपास यंत्रणा शोधत आहे. या प्रकरणाचा अधिक तपास करत असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी यांनी दिली.

## अमिताभ लग्नाला सर्वात मोठी चूक म्हणू शकतात: जया बच्चन म्हणाल्या - ५२ वर्षांपासून एकाच माणसाशी विवाहित आहे

**मुंबई/प्रतिनिधी** : अभिनेत्री आणि राज्यसभा खासदार जया बच्चन यांनी नुकतेच लग्न आणि नात्यांवर मोकळेपणाने भाष्य केले. त्यांनी लग्नाची संकल्पना कालबाह्य असल्याचे सांगितले आणि मस्करीत म्हणाल्या की कदाचित अमिताभ बच्चन यांच्यासाठी त्यांचे लग्न ही एक खूप मोठी चूक असू शकते.

खरं तर, वी द वुमन कार्यक्रमात बरखा दत्त यांच्याशी बोलताना जया यांनी सांगितले की, जेव्हा त्यांचे लग्न झाले होते, तेव्हा त्यांनी ते कायदेशीररित्या नोंदवले नव्हते. त्या म्हणाल्या, ''आम्ही रजिस्टरमध्येही भरले नव्हते, नंतर कळले की आता रजिस्टरवर सही करणे आवश्यक आहे, याचा अर्थ आम्ही अनेक वर्षे बेकायदेशीरपणे राहत होतो.''जेव्हा मुलाखतीत त्यांना विचारण्यात आले की अमिताभ बच्चन यांचीही लग्नाबद्दल तीच विचारसरणी आहे का, तेव्हा जया हसत म्हणाल्या, ''मी त्यांना कधीच विचारले नाही. कदाचित ते म्हणतील की माझ्या आयुष्यातील ही सर्वात मोठी चूक होती, पण मला ते ऐकायचे नाही.''

अमिताभ आणि जया बच्चन यांनी जंजीर, अभिमान, शोले, सिलसिला आणि कभी खुशी कभी गम यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले.

अमिताभ आणि जया बच्चन यांनी जंजीर, अभिमान, शोले, सिलसिला आणि कभी खुशी कभी गम यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले.

कदाचित हे पहिल्या नजरेतील प्रेम होते: जया

जेव्हा त्यांना विचारण्यात आले की, तुम्हाला तो क्षण आठवतो का, जेव्हा तुम्हाला जाणवले की तुम्ही अमितजींवर प्रेम करता? तेव्हा जया मस्करीत म्हणाल्या, ''तुम्हाला जुन्या जखमा उकरून काढायच्या आहेत का?''

मात्र, जया पुन्हा हसत म्हणाल्या, ''अरे, मी ५२ वर्षांपासून एकाच माणसाशी विवाहित आहे. आता यापेक्षा जास्त मी त्यांच्यावर प्रेम करू शकत नाही.''

शेवटी जया म्हणाल्या, ''मला वाटते, मी जे बोलत आहे ते थोडे विचित्र वाटू शकते, पण हो, कदाचित हे पहिल्या नजरेतील प्रेम होते.''

विशेष म्हणजे, अमिताभ आणि जयांचे लग्न बॉलिवूडमधील सर्वात प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक आहे. त्या दोघांमधील जवळीक गुड्डी आणि एक नजर या चित्रपटांच्या शूटिंगदरम्यान वाढली. १९७३ मध्ये जंजीर चित्रपट हिट झाल्यानंतर त्या दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. त्या दोघांचे लग्न ३ जून १९७३ रोजी झाले होते. अमिताभ आणि जया यांना श्वेता बच्चन नंदा आणि अभिषेक बच्चन अशी दोन मुले आहेत.

## झोपेत मुंगी चावली वाटलं पण बापाने लेकीच्या गळ्यावरून फिरवला होता ब्लेड, मुंबईत धक्कादायक घटना

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईतील दहिसर परिसरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. इथं एका व्यक्तीने आपल्या पोटच्या मुलीच्या गळ्यावरून ब्लेड फिरवला आहे. मुलगी झोपेत असताना आरोपी बापाने शांत डोक्याने हा खळबळजनक प्रकार केला आहे. या दुर्दैवी घटनेत मुलगी गंभीर जखमी झाली आहे. हा प्रकार लक्षात येताच आईने मुलीला वाचवण्याचा प्रयत्न केला. यावेळी आरोपीनं पत्नीवर ब्लेडने वार केले. या हल्ल्यात मायलेकी जखमी झाल्या असून त्याच्यांवर शताब्दी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.हनुमंत सोनवळ असं हल्लेखोर बापाचं नाव आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाचा पंचनामा करून पोलिसांनी आरोपी बापाला बेड्या ठोकल्या आहेत.

कोर्टातील केसवरून वाद विकोपाला

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हनुमंत सोनवळ याला आपल्या पत्नीचे बाहेर अनैतिक संबंध सुरू असल्याचा संशय होता. या संशयावरून दोघांमध्ये वारंवार खटके उडत होते. दोघांमध्ये अनेकदा मोठे वाद होत असत. या त्रासाला कंटाळून पत्नीने काही दिवसांपूर्वी कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता.

रविवारी याच घटस्फोटाच्या केसची माहिती घेऊन पत्नी घरी परतली, तेव्हा हनुमंतने तिला 'कुठे गेली होतीस' अशी विचारणा केली आणि त्यांच्यात पुन्हा जोरदार वाद पेटला. त्यांची मुलगीही सतत आईची बाजू घेत असल्याने आरोपी हनुमंतच्या मनात तिच्याबद्दलही राग खदखदत होता.

याच विकृत भावनेतून त्याने रविवारी रात्री २ वाजण्याच्या सुमारास हे भयंकर कृत्य केले. मुलगी झोपेत असताना त्याने तिच्या गळ्यावर ब्लेड फिरवला. मुलीला सुरुवातीला मुंगीने चावल्यासारखे वाटले, पण खाजवत असताना रक्त येत असल्याचे तिच्या लक्षात आले. तिने लगेच आरडाओरडा सुरू केला.

लेकीचा आरडाओरडा ऐकून आईला जाग आली आणि ती मुलीला वाचवण्यासाठी धावली. तेव्हा संतापलेल्या हनुमंतने तिच्यावरही ब्लेडने हल्ला करत पोटावर वार केला. इतकेच नव्हे, तर मायलेकींना वाचवण्यासाठी धावलेल्या शेजारच्या लोकांनाही त्याने ''मी तुम्हाला बघून घेईन,'' अशी धमकी दिली.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, मायलेकींवर सध्या कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पान १ वरून...

### राज्य सरकारने केंद्राला

मात्र, केंद्राला अवघा १.१० लाख हेक्टरचा आकडा दिला गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मदतीवरती प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. राज्याच्या प्रस्तावाशिवाय केंद्राकडून ३ हजार १३२.८० कोटी मदत आली आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मदतीवरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी हल्लाबोल केला आहे. त्यांनी म्हटलं आहे की हा प्रस्ताव जर केंद्राकडे पाठवला नसेल तर याचे उत्तर राज्य सरकारने दिले पाहिजे. राज्य सरकारचा हा बेजबाबदारपणा असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला आहे. ते म्हणाले केंद्राचे पत्रक दोनवेळा पाहण्यासाठी आले तरी देखील प्रस्ताव जात नसेल तर त्याला काय म्हणायचं अशी विचारणा त्यांनी यावेळी केली. प्रस्ताव पाठवू नये म्हणून राज्य सरकारवर कोणाचा दबाव आहे का? अशी शंका त्यांनी उपस्थित केली. जर मुख्यमंत्री याचे उत्तर देत नसतील, तर महाराष्ट्रात फिरत असताना शेतकरी त्यांना जाब विचारणार असल्याचा इशाराही राजू शेट्टी यांनी दिला.

सरकारने कोणता खुलासा केला?

दरम्यान, राज्याच्या मदत आणि पुनर्वसन प्रधान सचिवांनी प्रस्ताव आधीच गेल्याचे म्हटलं आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यात अतिवृष्टी आणि पुरग्रस्त भागासाठी केंद्राकडे मदतीचा प्रस्ताव गेला. राज्य सरकारकडून प्रस्ताव गेल्यानंतर केंद्राच्या चमूने पाहणी केल्याचं म्हटलं आहे, केंद्राकडे दोन प्रस्ताव गेले आहेत. त्यामध्ये एक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी असून दुसरा पायाभूत सुविधांच्या नुकसानीसंदर्भात असल्याची माहिती आहे. त्यामुळे पहिला शेतकऱ्यांच्या मदती संदर्भातील प्रस्ताव गेल्याचे स्पष्टीकरण सरकारकडून देण्यात आलं आहे. दुसरा प्रस्ताव पायाभूत सुविधांची नुकसानी संदर्भात असून त्यावर उद्या दिल्लीमध्ये चर्चा होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मदतीवरून आता फुटबॉल तरी सुरू नाही ना? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### साधुग्रामसाठी तपोवनात वृक्षतोडीवर

आमचं कुणाचंही असं मत नाही की झाडं तोडली गेली पाहिजेत. पण यात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. प्रयागराजला जिथे कुंभमेळा होतो, तिथे १५ हजार हेक्टर जागा आहे. आपला कुंभमेळा नाशिकला ज्या साधुग्रामला शतकानुशतके होत आहे, तिथे ३०० ते ३५० एकर जागा आहे. २०१५-१६ चा गुगल मॅप बघितला, तर तेव्हा यातलं कुठलंच झाड तिथे दिसत नाही. महाराष्ट्र सरकारने ५० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेतला, तेव्हा नाशिक महापालिकेनं ही झाडं लावली'', असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ''आता तिथे साधुग्राम तयार करता येत नाही कारण वृक्षांची दाटी तिथे निर्माण झाली आहे. तिथे झाडं कापूच नये किंवा कमीत कमी झाडं कापली जावी, कापल्या जाणाऱ्या झाडांची पुनर्लागवड कशी करता येईल यासाठी सरकार प्रयत्नशील आहे'', असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### गोदामातील ईव्हीएममध्ये गडबड

आता निकालदेखील ३ डिसेंबर ऐवजी २१ डिसेंबरला लागणार आहे. सोळा ते सतरा दिवस मतपेट्या गोदामात ठेवल्यानं काही घालमेल करायची असेल तर सरकारला त्यासाठी भरपूर वेळ मिळेल. यामुळं लोकांचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास उडत चालला आहे.''

सरकारी वकील झोपले होते का? : पृथ्वीराज चव्हाण पुढे म्हणाले की, ''सरकार आणि निवडणूक आयोग एकमेकांवर जबाबदारी ढकलून मोकळं होतंय. परंतु, नगरपालिका निवडणुकीच्या संदर्भात कोर्टात जी केस चालली होती, त्यावेळी सरकारी वकील झोपले होते का? त्यामध्ये सरकारच्या वकिलानं प्रभावीपणे बाजू मांडायला पाहिजे होती. आम्हाला तातडीनं निकाल हवा आहे, अशी बाजू मांडायला पाहिजे होती. मग, हे निकाल पुढे गेले नसते. ती बाजू मांडायला सरकारला अपयश आलं.''

...तर देशात हुकुमशाही आलेली दिसेल : ''या प्रकरणात निवडणूक आयोगाला दोष देऊन आता काही उपयोग नाही. कारण, हा निकाल न्यायालयानं दिलेला आहे. जोपर्यंत जनता जागृत होत नाही, तोपर्यंत हळूहळू असंच होत राहणार आहे. शेवटी या देशात आपल्याला लोकशाही नाही तर संपूर्णपणे हुकुमशाही आलेली दिसेल'', अशी भीतीही पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केली.

### आंध्रप्रदेश दारू घोटाळा :

वस्तू खरेदी करण्याच्या नावाखाली हे आरोपी विविध शेल कंपन्यांच्या खात्यात जमा करत होते. त्या शेल कंपन्यांचे व्यवस्थापक त्यांचं कमिशन वगळून उर्वरित रक्कम काढून घेत होते. त्या तत्कालीन सरकारी अधिकाऱ्यांना आणि दारू घोटाळ्यातील आरोपींना सोनं आणि रोख स्वरूपात देत असत', असं एसआयटीच्या तपासात आढळून आलं. चेतन कुमार आणि रौनक कुमार यांनी मुंबईतील अनिल चोखरा (ए-४९) याच्याशी मिळून हा कट रचल्याचा संशय एसआयटीला आहे.

एसआयटीची दोन्ही आरोपींना नोटीस : अनिल चोखरा याची दोन दिवसांपासून एसआयटीचे अधिकारी चौकशी करत आहेत. एसआयटीतील अधिकाऱ्यांनी चेतन कुमार आणि रौनक कुमार या दोघांनी चौकशी करण्यासाठी नोटीस बजावली आहे. अनिल चोखरा याच्यासोबत त्या दोघांची चौकशी केली तर त्याचं बिंग फुटेल, अशी भीती चेतन कुमारला वाटली. त्यामुळे अटक टाळण्यासाठी चेतन कुमार यानं आजारी असल्याचं सांगून चौकशीला दांडी मारली.

पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या रौनक कुमारला अटक : दारू घोटाळ्यातील चौकशीसाठी सोमवारी विजयवाडा इथं आलेल्या रौनक कुमारची मंगळवारी एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी पुन्हा चौकशी केली. त्यानंतर त्याला बुधवारीही चौकशीसाठी बोलावलं. मात्र अटक होण्याच्या भीतीनं त्यानं एसआयटीच्या अधिकाऱ्यांना गुंगारा देत मुंबईत पळून जाण्याचा प्रयत्न केला. एसआयटी अधिकाऱ्यांना याची माहिती मिळताच एसआयटीनं त्याला गन्नवरम विमानतळावर अटक केली. बुधवारी विजयवाडा इथल्या एसीबी न्यायालयात त्याला हजर केलं जाणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. विशेष म्हणजे चेतन आणि रौनक या दोन बंधूचं मुंबईत चामुंडा बुलियन, महालक्ष्मी ज्वेलरी, रुचिता ज्वेलरी आदी नावांनी दागिन्यांचा व्यवसाय आहे. या दोघांविरोधात अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यांचे वडील जसराज पालगोटा उर्फ पूनमभाई यांचे दुबईतील अनेक लोकांशी आर्थिक संबंध आहेत, अशी माहिती एसआयटीच्या अधिकाऱ्यांना मिळाली.

### तपोवनातील वृक्षतोडीवरून वाद

नाशिकमध्ये वृक्षतोडीच्या विरोधात आंदोलनाचे सत्र सुरू आहे. तपोवनमध्ये साधुग्राम साकारण्याऐवजी ते अन्य मोकळ्या जागेत उभारावे, अशी मागणी पर्यावरणप्रेमींसह नाशिककरांकडून होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वृक्षतोडीचे राजकारण होत असून तपोवनातील झाडे गेल्या चार ते पाच वर्षातील असून झाडे वाचली पाहिजे आणि साधुग्रामही झाले पाहिजे, असा मध्यमार्ग काढला जाईल असे म्हटले आहे. आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या वादावर प्रतिक्रिया दिली आहे. तपोवनातील वृक्षतोडीच्या संदर्भात सामोपचाराने तोडगा काढला पाहिजे. या संदर्भात सयाजी शिंदे यांनी घेतलेली भूमिका पर्यावरण हिताची आहे. विकासाबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणं ही देखील काळाची गरज आहे. पर्यावरण वाचलं तर पुढची पिढी सुरक्षित राहिल, हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी म्हटले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## टीम इंडियाला पहिला मोठा धक्का! रोहित शर्मा स्वस्तात परतला माघारी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना रांचीत पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेवर दमदार विजयाची नोंद केली. मालिकेतील दुसरा वनडे सामना रायपूरच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. हा सामना जिंकून भारतीय संघ मालिकेत विजयी आघाडी घेण्याच्या प्रयत्नात असणार आहे. गेल्या सामन्यात अर्धशतकी खेळी करणारा रोहित शर्मा या सामन्यात १४ धावा करून माघारी परतला आहे.

या सामन्यासाठी अशी आहे दोन्ही संघांची प्लेईंग ११:

दक्षिण आफ्रिका (इत्तब्र्हु ेंद): क्विंटन डी कॉक(यष्टिरक्षक), एडन मार्करम, टेंबा बावुमा(कर्णधार), मॅथ्यू ब्रीत्झके, टोनी डी झोर्झी, डेवाल्ड ब्रेविस, मार्को यान्सन, कॉर्बिन बॉश, केशव महाराज, नांद्रे बर्गर, लुंगी एनगिडी

भारत: यशस्वी जैस्वाल, रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, वॉशिंग्टन सुंदर, केएल राहुल(यष्टिरक्षक/कर्णधार), रवींद्र जडेजा, हर्षित राणा, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, प्रसिध कृष्णा

## चुकीला माफी नाही! हर्षित राणावर आयसीसीची मोठी कारवाई, २२ व्या ओव्हरमध्ये काय घडलं होतं?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** विराट कोहलीच्या शानदार शतकाच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १७ रन्सने सामना जिंकला. या सिरीजमधील दुसरा मॅच आज रायपूर येथे होणार आहे. अशातच आता आयसीसीने टीम इंडियाचा बॉलर हर्षित राणा याच्यावर कारवाई केली आहे. भारताच्या युवा बॉलर हर्षित राणाने नुकत्याच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या वनडे सामनात केलेल्या एका कृतीमुळे त्याला आयसीसीच्या आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला आहे.

आयसीसीच्या नियमांचे उल्लंघन

रांची येथे झालेल्या पहिल्या सामनात भारताने विजय मिळवला असला तरी, या विजयानंतर हर्षित राणाला आयसीसीच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ताकीद मिळाली आहे. ही कारवाई आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडूंनी पाळावयाच्या शिस्तीचे महत्त्वाची असल्याचं आयसीसीने म्हटलं आहे. पण मॅचमध्ये काय झालं होतं?

हा प्रसंग दक्षिण आफ्रिकेच्या डावातील २२ व्या ओव्हरमध्ये घडला. जेव्हा भारतीय पॅसर हर्षित राणा याने साऊथ अफ्रिकन फलंदाज डेवाल्ड ब्रेविस याला आऊट केलं. ब्रेविस आऊट झाल्यानंतर, हर्षित राणाने त्याला ड्रेसिंग रूमच्या दिशेने जाण्याचा हावभाव केला. आयसीसीने (घ्ण्ण) हर्षितचे हे कृत्य खेळाडू आणि सपोर्ट कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या आचारसंहितेच्या कलम २.५ चे उल्लंघन मानले आहे.

कलम २.५ हे 'फलंदाजाला बाद केल्यानंतर त्याला चिथावणी देणारी किंवा अपमानजनक भाषा, कृती किंवा हावभाव वापरण्याशी' संबंधित आहे. हर्षित राणाची ही कृती फलंदाजाकडून आक्रमक प्रतिसाद मिळवण्यासाठी कारणीभूत ठरू शकते, असं मानलं गेलं आहे. त्यामुळे हर्षितवर ताकीद म्हणून दंडात्मक कारवाई करण्यात आली नसून, त्याच्या शिस्तभंगाच्या रेकॉर्डमध्ये एक 'डेमेरिट पॉइंट' जोडला गेला आहे.

दरम्यान, मागील २४ महिन्यांतील हा त्याचा पहिलाच गुन्हा असल्याने, त्याला फक्त ताकीद मिळाली आहे. हर्षितने आपला गुन्हा मान्य केला असून, मॅच रेफ्री रिची रिचर्डसन यांनी प्रस्तावित केलेली शिक्षा स्वीकारली आहे.

# शेतात जाणारे रस्ते होणार सुसाट! राज्य सरकारची 'मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना' काय आहे?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. जसे देशाला विकासासाठी मजबूत राष्ट्रीय महामार्गांची गरज असते. तसेच ग्रामीण शेतकऱ्यांना शेतात जाणाऱ्या पाणंद रस्त्यांची गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकरी बांधवांना त्यांच्या शेतापर्यंत सहज पोहोचता यावे. पेरणीपासून ते कापणीपर्यंतच्या सर्व कामांसाठी कृषी यंत्रसामग्रीचा वापर सुरळीतपणे करता यावा आणि पिकांचे उत्पादन बाजारापर्यंत विनाव्यत्यय पोहोचावे यासाठी उत्तम पाणंद रस्ते आवश्यक आहेत. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकारने महसूल विभागामार्फत 'मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना' राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेची कणा असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही योजना एक मोठा दिलासा मानली जात आहे.

योजनेचा उद्देश काय?

राज्यातील अनेक भागांत पाणंद रस्ते अतिशय खराब अवस्थेत आहेत. पावसाळ्यात कीच, उन्हाळ्यात धूळ आणि दगडखचांनी भरलेले रस्ते शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीकामात अडथळा निर्माण करतात. अनेक ठिकाणी ट्रॅक्टर, हार्वेस्टर किंवा इतर यंत्रसामग्री शेतात घेऊन जाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागतो. अशा स्थितीत ही योजना ग्रामीण भागासाठी गेमचेंजर ठरू शकते. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, पाणंद रस्ते उच्च दर्जाच्या मानकांनुसार



तयार करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच रस्त्यांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना लवकरात लवकर त्याचा लाभ मिळू शकेल.

कोणत्या गोष्टी मोफत मिळणार?

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे रस्त्यांच्या बांधकामासाठी लागणारा मुरूम, माती, दगड आणि गाळ हे सर्व शेतकऱ्यांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना महसूल विभागाच्या शेततळ्यांमधून, पाझर तलावांमधून, नाल्यांमधून आणि बंधाऱ्यांतून निघणारा गाळ व माती कोणत्याही खर्चाशिवाय मिळू शकेल. घरकुल लाभार्थ्यांनाही याचा फायदा होणार आहे. यामुळे रस्ते बांधण्यासाठी लागणाऱ्या साहित्याचा तुटवडा भासणार नाही आणि कामे वेगाने पार पडतील.

काय फायदे होणार?

पाणंद रस्ते सुधारल्याने ग्रामीण भागात अनेक सकारात्मक बदल घडू शकतात. चांगले रस्ते उपलब्ध झाल्यामुळे शेतीसाठीची अवजारे, ट्रॅक्टर, तसेच शेतमाल बाजारात नेण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे शेतीची कार्यक्षमता वाढेल, मजुरीची बचत होईल आणि पिकांचे नुकसानही टळेल. शेतकरी वेळेत शेतीपिकांची कामे करू शकतील, ज्याचा थेट परिणाम उत्पन्नवाढीवर होईल.

## तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी हिंदू देव-देवतांबद्दल काय म्हणाले? भाजपाकडून राज्यभरात आंदोलनाची तयारी

**मुंबई/प्रतिनिधी :** तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी मंगळवारी हैदराबाद येथील गांधी भवनात काँग्रेस कार्यकारिणीला संबोधित करत असताना हिंदू देव-देवतांबद्दल भाष्य केले. या विधानामुळे तेलंगणातील राजकारण सध्या ढवळून निघाले आहे. पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत असताना विनोदाच्या स्वरुपात केलेल्या मांडणीवर भाजपाने आक्षेप घेतला असून राज्यभरात आंदोलन करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

रेवंत रेड्डी यांनी पक्षाच्या विविधतेवर प्रकाश टाकताना हिंदू धर्माशी तुलना केली. त्यांनी म्हटले, काँग्रेस पक्ष सर्व प्रकारच्या लोकांना बरोबर घेऊन चालतो. जसे की, हिंदू धर्मात कुणी भगवान व्येंकटेश्वरची पूजा करतो, कुणी हनुमानाची भक्ती करतो. आपण देव-देवतांच्या बाबतीतही विभागले गेलेलो आहेत.

प्रत्येकाचा देव वेगळा

मुख्यमंत्री रेवंत रेड्डी पुढे म्हणाले, ''हिंदू धर्मात किती देव आहेत? तीन कोटी? असे का? जे लोक अविवाहित आहेत, ते हनुमानाची भक्ती करतात. ज्यांनी दोन लग्न केली, त्यांचा देव वेगळा आहे. जे मद्य पितात त्यांचा देव निराळाच. येलम्मा, पोचम्मा, मैसम्मा हेही देव आहेत. जे चिकन-मटण खातात, त्यांचा देवही वेगळा आहे. जे डाळ-भात खातात, त्यांचा देव भलताच आहे. बरोबर ना? आपल्याकडे सर्व प्रकारचे देव आहेत.''

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष जी. रामचंद्र राव यांनी रेवंत रेड्डी यांच्या विधानावर तीव्र आक्षेप घेतला आहे. हिंदूंच्या भावनांचा अपमान झाला असून मुख्यमंत्री रेड्डी यांनी माफी मागावी, असे ते म्हणाले आहेत. रामचंद्र राव म्हणाले, काँग्रेस पक्ष नेहमीच हिंदूंची थट्टा करत असतो. निवडणुकीत पराभव झाल्यानंतर ते ईव्हीएमला दोष देतात.

केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी आणि बंदी संजय कुमार यांच्यासारख्या वरिष्ठ नेत्यांनीही रेड्डी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. किशन रेड्डी म्हणाले की, एमआयएम बरोबर काँग्रेसची मैत्री असल्यामुळेच ते हिंदू आणि हिंदू देवी-देवतांबद्दल अहंकारांने भरलेली टिप्पणी करत आहेत. तेलंगणातील हिंदूंनी आता एकत्र येण्याची वेळ आली आहे. रेवंत रेड्डी आणि काँग्रेस पक्षाला आता हिंदूंची ताकद दाखवून द्यायची वेळ आली आहे.

## जागा उपलब्ध असताना वृक्ष तोड का करावी? महायुतीमध्ये जरी असलो तरी.... तपोवनातील वृक्षतोडीवरून राष्ट्रवादीचे प्रवक्ते सुरज चव्हाणांची रोखठोक भूमिका

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमधील तपोवन परिसरातील साधुग्रामच्या जागेत सुरू असलेल्या वृक्षतोडीविरोधात पर्यावरणप्रेमी व वृक्षप्रेमींचे आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत चालले आहे. या मुद्द्यावर राजकीय नेते, सिनेसृष्टीतील अनेक सेलिब्रिटीही सोशल मीडियावरून याबाबत आवाज उठवत आहेत. याबाबत आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील सोशल मिडीयावरती पोस्ट लिहून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

सुरज चव्हाण यांनी म्हटलंय की, तपोवन येथे कुंभमेळ्याच्या निमित्ताने वृक्षतोड करण्याचा काहींची मानस आहे, तपोवन तोडून भाविकांची सेवा करण्याचा काहींचा मानस आहे. काळाची गरज पाहता वृक्षतोड झाली पाहीजे नाही. ३०-४० किमी चालून लोक कुंभमेळाव्यात शाहीस्नान करत होते हे आम्ही पाहिले आहे. जागा उपलब्ध असताना वृक्ष तोड का करावी? हा प्रश्न आहे. वृक्ष तोड थांबवावी ही आमची भूमिका आहे, वृक्षप्रेमी म्हणून अनेक लोक बोलत आहेत, महायुतीमध्ये जरी असलो तरी जरी काही असले तर आम्ही बोलण्याची ताकद ठेवतो, सरकारने जनतेसाठी वृक्षप्रेमींचा विचार करावा असंही त्यांनी म्हटलंय

त्याचबरोबर त्यांनी एक सोशल मिडीया पोस्ट देखील लिहली आहे. त्या पोस्टमध्ये सुरज चव्हाण यांनी म्हटलंय की, ''तपोवनचा शब्दश: अर्थ ध्यान आणि तपश्चर्यासाठी राखून ठेवलेला परिसर.पंचवटीच्या पुढे तपश्चर्येसाठी असा परिसर आहे म्हणून त्याला तपोवन असे नाव पडले. ऋषीमुनी हिरव्यागार निसर्गाच्या सान्निध्यात ध्यान करत असत. हिरवीगार झाडं असलेला हा परिसर तोडण्याचा घाट सत्तेतेल्या काही लोकांनी घातला आहे.खरं तर जवळच पर्यायी जागा उपलब्ध असताना वृक्ष तोडून त्याच ठिकाणी व्यवस्था करण्याचा अट्टहास का ? हजारो किलोमीटर वरून येणारे भाविक दहा,पंधरा किलोमीटर अंतरावर राहू शकतात चालत जाऊन स्नान करू शकतात.प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळाव्यात अनेक लोक ३०



किलोमीटर पायी जाऊन शाहीस्नान केलेले आहेत.मग आपल्या इकडेच दहा,पंधरा वर्षीची जुनी वृक्ष तोडून तपोवनातच व्यवस्था का करावी वाटतेय ? तपोवनातील वृक्ष तोडून त्याबदल्यात दुसरीकडे तेवढीच नवीन वृक्ष बाहेरून आणून का लावू असं गिरीष महाजनजी म्हणतायत ? आहेत ती झाडं जपायची सोडून जुनी तोडायची आणि दुसरीकडे नवीन झाडं लावायची हा कार्यक्रम कशासाठी ? वृक्ष प्रेमी म्हणून सरकारला एवढीच विनंती आहे या वृक्षतोडीचा सहानुभूती पूर्वक विचार करावा'', असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

अजित पवारांची पोस्ट काय?

तपोवनातील वृक्षतोडीच्या संदर्भात समोपचारानं तोडगा काढला पाहिजे. यासंदर्भात अभिनेते सयाजी शिंदे यांनी घेतलेली भूमिका पर्यावरण हिताची आहे. विकासाबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणं ही देखील काळाची गरज आहे. पर्यावरण वाचलं तरच पुढची पिढी सुरक्षित राहीलं, हे आपण सर्वांनी लक्षात ठेवलं पाहिजे, अशी पोस्ट अजित पवारांनी त्यांच्या सोशल मिडीयावरून लिहली आहे.

## शब्दकोडे क्र. 27

आडवे शब्द

१. '... दादा मला एक वहिनी अण' १०. विशेष १२. रात्रीचा पाऊस १३. उमर १४. वस्त्र, कापड १६. शेतकरी १७. युवती १८. बरगडी १९. घट्ट २१. घरातील वरचा भाग २२. कारभार, नस्ता उद्योग! २३. गाय २४. गोष्टीतील वनमानव (इंग्रेजी) २६. दगड, लाकूड यांचा पातळ २७. जनावर, माणूस इ. २८. पोशाख (अनेक वचन) ३०. वृद्धत्व, म्हातारपण ३१. जोराचा रट्टा ३२. पादत्राण ३४. पिशाच, वेडा मनुष्य ३६. बारीक झिणझिण ३८. अपऱ्या नाकाचा ४०. अविवेकी, अतिरेकी कृत्य ४१. दिखाऊ, वरवर ४२. पुरुष ४३. पाणी उकळण्याचा आवाज ४६. शिष्य ४८. बाजेची कापडी पट्टी ४९. घटस्फोट ५१. रोखलेली नजर ५२. मलई ५३. तफावत, अंतर ५५. पारंब्याचा एक वृक्ष ५६. शुल्क ५७. जेमतेम ५९. आश्चर्य ६१. लज्जास्पद ६२. अभिनेता ६३. हयगय, दुर्लक्ष ६४. नंतर ६५. च्या बरोबर ६७. भीमाजवळचे शास्त्र ६८. एक कालवण ६९. सहाय्यक ७१. मरणारा, प्रतिस्पर्धी ७२. महाभारतातील वास्तुशास्त्रज्ञ ७३. आपला नसलेला ७४. राजवाड्यातील दालन ७५. सोंग वठवणारा ७६. पद्धतीप्रमाणे ७७. बांबू

उभे शब्द

१. गौर वर्णाचा २. पद्धत ३. पणजीचे राज्य ४. पर्जन्यकाळ ५. डोळे ६. अत्यंत किंमतीची, मौल्यवान ७. पाताळ ८. सैन्याच्या मुक्कामाची जागा ९. शीर, धमनी ११. सर्वत्र, चोहीकडे १५. फायदा, तोटा १६. कमीत कमी १९. भांडण २०. गरजू २२. मेहरबानी २५. पाण्याचा उगम २६. केस २७. जीव २९. झटकम ३२. जुजबी ३३. अधाशी, लालची ३५. चालत चालत ३७. चुनखडीचा दगड ३९. वात्रट, चावट ४३. जाडसर पीठ ४४. शेंगेवरील साल ४५. शेवट, अखेर ४६. कैद ४७. हानी, तोटा करणारे ४८. नेत्रकटाक्ष ५०. कट्टर ५४. भांडण, खोडी ५८. केसांची लट ६०. माराची उमटलेली खूण ६३. नाविक दल ६४. कैफी, नशा आणणारे ६५. फटाक्याची माळ ६६. उगीच ६७. जाणे, प्रस्थान करणे ६९. जळलेला, करपलेला भाग ७०. युद्ध ७१. धनी ७३. पान


### शब्दकोडे क्र. 26 चे उत्तर

आडवे उत्तर

१.गोरी गोरी पान फुलासारखी छान १०.खास १२.रातवा १३.वय १४.वसन १६.किसान १७.तरुणी १८.फासळी १९.तग २१.माळा २२.उलाढाल २३.धेनु २४.टारझन २६.कपची २७.प्राणी २८.कपडे ३०.जरा ३१.कचका ३२.वहाण ३४.पिसाट ३६.रवरव ३८.नकटा ४०.आततायीपणा ४१.नवार ४९.फारकत ५१.टक ५२.साय ५३.फरक ५५.वड ५६.फी ५७.कसाबसा ५९.नवल ६१.लाजिरवाणे ६२.वरण ६२.नट ६३.आबाळ ६४.मग ६५.सह ६७.गदा ६८.वरण ६९.मदतनीस ७१.मारक ७२.परका ७४.महाल ७५.नकलाकार ७६.रीतसर ७७.कळक

उभे उत्तर

१.गोरा २.रीत ३.गोवा ४.पावसाळा ५.नयन ६.लाखमोलाची ७.रसातल ८.छावणी ९.नस ११.सगळीकडे १५.नफानुकसान १६.किमान १९.तंटा २०.गरजवंत २२.उपकार २५.झरा २६.कच २७.प्राण २९.पटकन ३२.वरवर ३३.हावरट ३५.पायीपायी ३७.संगमरवर ३९.टारगट ४३.अटक ४७.नुकसानदायक ४८.नयनबाण ५०.कडवा ५४.कलागत ५८.बट ६०.वळ ६३.आरमार ६४.मदकारी ६५.सर ६६.हकनाक ६७.गमन ६९.मर ७०.समर ७१.मालक ७३.पर्ण



# काशी येथे युवावेदमूर्ती देवव्रत रेखे यांना दंडक्रम महाविक्रमादित्य पदवी प्रदान, पंतप्रधानांनी केलं कौतुक

**दैनिक आपला विदर्भ**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** देवव्रत रेखे यांनी अत्यंत दुर्मिळ आणि अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या वैदिक दंडक्रम पारायणाचे कंठस्थ पठण केवळ ५० दिवसांत पूर्ण करून इतिहास रचला आहे. सुमारे २५ लाखांहून अधिक मंत्रांचे अखंड पठण करून दंडक्रम पूर्ण करणारे देवव्रत हे जगातील सर्वात युवा पारायणकर्ता ठरले आहेत. या अलौकिक कार्याबद्दल त्यांना दंडक्रम विक्रमादित्य ही मानाची उपाधी प्रदान करण्यात आली आहे.

श्री श्रृंगेरी शारदा पीठ दक्षिणाम्नाय श्रीमदब जगद्गुरू शंकराचार्य पीठातर्फे देवव्रत यांना ५ लाख रुपये व सोन्याचं कडं तसेच, महावस्त्र व दक्षिणा देऊन सन्मानित करण्यात आलं. यावेळी अनेक संत-महंत व्यासपीठावर उपस्थित होते. वैदिक सम्राट श्रीकृष्णशास्त्री गोडसे यांच्या जन्म शताब्दीच्या निमित्तानं श्री क्षेत्र काशी येथे १२ ऑक्टोबर ते २९ नोव्हेंबर





दरम्यान कंठस्थ दंडक्रम पारायण पार पडले. या पारायण काळामध्ये देवव्रत यांनी सुमारे २५ लाखांपेक्षा जास्त श्लोकांचं पठण करून वैदिक क्षेत्रात विश्वविक्रम केला.

देवव्रत यांनी २०० वर्षांनंतर पूर्ण केलं 'दण्डक्रम पारायण' : या ऐतिहासिक कार्याबाबत, महेश रेखे यांनी सांगितलं की, दण्डक्रमाचे पारायण फारसे केल्याचे आढळत नाही. सुमारे २०० वर्षांपूर्वी नाशिक येथील वेदमूर्ती घनपाठी नारायण शास्त्री देव यांनी दण्डक्रम पारायण केल्याचे ऐकिवात आहे. या लुप्त होत असलेल्या परंपरेचं जतन व्हावं ह्या उद्देशानं या पारायणाचे आयोजन करण्यात आलं. १९ वर्षांच्या देवव्रत रेखे यांनी दोन हजार मंत्र आणि वैदिक श्लोकांचे शुद्ध उच्चारणासह पठण केलं. भारताच्या सनातन गुरू परंपरेत यास ''दंडक्रम पारायण'' म्हणतात. हे पारायण पूर्ण केल्यानंतर संबंधित व्यक्तीस वेदमूर्ती ही पदवी देऊन सन्मानित केलं जातं. देवव्रत महेश रेखे यांनी २०० वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला आहे.

पंतप्रधान मोदींनी केलं कौतुक : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील देवेव्रत रेखे यांच्या यांच्या कार्याचं कौतुक केलं आहे. देवव्रत यांच्या महाविक्रमाबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एक्स मीडियातील पोस्टमध्ये म्हटले की, १९ वर्षांचे देवव्रत महेश रेखे यांनी मिळिवलेलं यश कळाल्यानंतर मन प्रफुल्लित झालं आहे. त्यांचं हे यश आपल्या येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. भारतीय संस्कृतीवर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हे जाणून आनंद होईल की, श्री देवव्रत यांनी शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यंदिन शाखेतील २००० मंत्रांचा 'दण्डकर्म पारायणम्' हे अनुष्ठान ५० दिवस अखंड आणि विनाविघ्न पूर्ण केलं आहे. यात अनेक वैदिक ऋचा आणि सर्वाधिक पवित्र शब्दांचा उल्लेख आहे. याचं त्यांनी पूर्ण शुद्धतेनं उच्चारण केलं. हे यश आपल्या गुरु-परंपरेचे सर्वोत्तम उदाहरण आहे. काशीचे खासदार म्हणून मला अभिमान वाटतो की, त्यांची ही अद्भुत साधना याच पवित्र भूमीवर संपन्न झाली. या तपश्चर्येत त्यांना सहकार्य करणाऱ्या त्यांच्या कुटुंबीयांना, संतांना, मुनींना, विद्वानांना आणि देशभरातील त्या सर्व संस्थांना माझा प्रणाम.

महाराष्ट्र शासन सन्मान करणार - देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेदमूर्ती देवव्रत रेखे यांनी आपल्या तरुण वयाच्या १९व्या वर्षी श्री क्षेत्र काशी येथे ५० दिवसात १६५ तासांपेक्षा कमी वेळात अत्यंत कठीण असे कंठस्थ दंडक्रम पारायण करून दंडक्रम विक्रमादित्य ही पदवी प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन. युवा वेदमूर्ती देवव्रत रेखे यांचा सन्मान महाराष्ट्र शासनातर्फे केला जाईल असे त्यांनी देवव्रतला पाठवलेल्या अभिनंदन पत्रात म्हटलं आहे. यासोबतच, मंत्री चंद्रकांत दादा पाटील, अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनीही देवव्रत रेखे यांचं अभिनंदन केलं आहे.

## वृत्तविशेष...

### राज्य विधिमंडळाचे नागपूर हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर दरम्यान

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार ८ ते रविवार १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. १३ डिसेंबर शनिवार आणि १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, विधानसभा सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू, अमीन पटेल विधानपरिषद सदस्य अनिल परब, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या ऐतिहासिक पर्वानिमित्त २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत चर्चा झाली होती. या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन महाराष्ट्र विधिमंडळ वि.स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार, ९ डिसेंबर २०२५ रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यावेळी सांगितले.

### गौरीला तिघांनी गळा दाबून मारलं, अनंत गर्जे प्रकरणात मोठी अपडेट

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या डॉक्टर पत्नी गौरी गर्जे पालवे यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईतील वरळी इथं आपल्या राहत्या घराच आयुष्याचा शेवट केला होता. या प्रकरणी पोलिसांनी पती अनंत गर्जेला अटक केली होती. मागील काही दिवसांपासून पोलीस त्याची कसून चौकशी करत होता. आता या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे.

गौरी गर्जेनं आत्महत्या केली नाही, तर तिला तिघांनी गळा दाबून मारलंय, असा दावा गौरीचे वडील अशोक पालवे यांनी केला आहे. अनंत गर्जे याची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. त्याला कोर्टाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यानंतर गौरीच्या आई वडिलांनी खळबळजनक दावे केले आहेत.

याप्रकरणी गौरीचे वडील अशोक पालवे म्हणाले की, गौरीच्या मृत्यू प्रकरणात फक्त एकटा अनंतच आरोपी नाही. त्याचे बहीण-भाऊ देखील यात आरोपी आहेत. त्या दोघांना अद्याप अटक केली नाही. लग्न होण्याआधीपासून अनंत वरळीत राहत होता. माझ्या मुलीला दोघा तिघांनी गळा दाबून मारलं आहे. आम्ही खरं बोलत आहोत. एकतर आम्हाला न्याय द्या, नाहीतर आम्हाला मारण्याची परवानगी द्या. फॉरेन्सिक टीम घरामध्ये गेल्यानंतर त्यांचे नातेवाईक त्या घरांमध्ये उपस्थित होते. त्यामुळे गौरीच्या मृत्यूला आत्महत्येचं लेबल लावू नका.

### पोलीस उपनिरीक्षक बनला 'मुन्नाभाई'; 'डमी' परीक्षार्थी प्रकरणात पिंपरीतील उपनिरीक्षक अटकेत

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** भावाला पोलीस करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्यालयातील पोलीस उपनिरीक्षकाने लेखी परीक्षा दिली. नऊ वर्षानंतर पोलीस उपनिरीक्षकाने केलेली फसवणूक उघडकीस आले. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षकाला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयने त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

सुप्पडसिंग शिवलाल गुसिंगे असे अटक करण्यत आलेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे. याप्रकरणी त्याचा भाऊ गजानन शिवलाल गुसिंगे (रा. कौचलवाडी, रोहिलागड, ता. अंबड, जि. जालना) याच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तोतयेगिरी, फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे, कट रचणे, तसेच परीक्षांमधील गैरप्रकारास प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शिवाजीनगर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर २४ एप्रिल २०१६ रोजी पोलीस भरती प्रक्रियेतर्गत लेखी परीक्षा पार पडली होती. भरती प्रक्रियेत गजानन गुसिंगे उमेदवार होता. त्याने ५ आणि ६ एप्रिल २०१६ रोजी मैदानी चाचणी दिली होती. त्यानंतर २४ एप्रिल रोजी झालेल्या लेखी परीक्षेत त्याने 'डमी' परीक्षार्थीला परीक्षा देण्यास सांगितले होते.

गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शिवशाहीर डॉ. विजय तनपुरे यांची ३००० फूट उंच भरारी

**दैनिक आपला विदर्भ**



**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** जागतिक दिव्यांग दिनाच्या औचित्यानं शिवशाहीर आणि प्रेरणादायी वक्ते डॉ. विजय तनपुरे यांनी बुधवारी लोणावळ्यातील ॲम्बी व्हॅली एअरपोर्टवरून ३ हजार फूट उंचीवर हमरशूट पॅरामोटार उड्डाण करत विक्रम नोंदवला. या ऐतिहासिक साहसी उपक्रमाचं नियोजन, मार्गदर्शन आणि संपूर्ण व्यवस्था उद्योजक कॅप्टन विजय सेठी यांनी केली. 'दोन विजय एकत्र आले आणि हा विजय घडला' या अर्थपूर्ण संदेशासह हा अनोखा उपक्रम साकार करण्यात आला.

आणखी एक इतिहास घडवण्यात यशस्वी : ''माझा विजय आकाशात दिसतोय आणि विजय सेठी यांचा विजय माझ्या मनात आहे. या शब्दांतून साहसातील धैर्य आणि आनंद स्पष्ट दिसून येत होता. ही घटना फक्त धाडसाची नाही तर प्रेरणादायी संदेशाचीही आहे. १९९३ साली माझ्या पहिल्या पोवाडा कॅसेटचे प्रकाशन करणारेही विजय सेठीच होते. तब्बल तीन दशकांनंतर दोन्ही विजय पुन्हा एकत्र येऊन आणखी एक इतिहास घडवण्यात यशस्वी झाले,'' असं डॉ. तनपुरे म्हणाले. या साहसातून डॉ. तनपुरे यांनी धैर्य, जिद्द आणि क्षमतेचा प्रभावी संदेश दिला. तसंच जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्तानं समाजात सकारात्मक ऊर्जा पसरवली. त्यांनी सिद्ध केलं की, दिव्यंगत्व किंवा कोणतंही आव्हान आपली उड्डाण क्षमता कमी करू शकत नाही.

उपक्रम साहसी अनुभव नव्हे तर प्रेरणादायी संदेशाचे प्रतीक : उड्डाणानंतर उपस्थितांनी डॉ. तनपुरे व विजय सेठी यांचं कौतुक केलं. हा उपक्रम फक्त एक साहसी अनुभव नव्हता, तर प्रेरणादायी संदेशाचे प्रतीक बनला. यातून दिव्यांग व्यक्तींसह समाजातील सर्वांना प्रेरणा दिली. जागतिक दिव्यांग दिनी डॉ. तनपुरे यांनी आकाशात विजय झळकवून धैर्य आणि जिद्दीची उजळणी केली. या साहसातून धैर्य, जिद्द आणि क्षमता यांचा प्रभावी संदेश देत जागतिक दिव्यांग दिनाचा अर्थपूर्ण उत्सव शिवशाहीरांनी आकाशात उजळून टाकला आहे.

जागतिक दिव्यांग दिनाचा इतिहास : जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याची घोषणा संयुक्त राष्ट्रांनी १९९२ मध्ये महासभेच्या ठरावाद्वारे केली होती. हा वार्षिक साजरा सर्वसाधारण सभेच्या ठराव ४७/३ अंतर्गत घोषित करण्यात आला होता. त्याचा उद्देश समाजाच्या सर्व क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींचे हक्क आणि कल्याण यांना प्रोत्साहन देणं आहे. याशिवाय राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये दिव्यांग व्यक्तींच्या स्थितीबद्दल जागरूकता निर्माण करणं आहे. संयुक्त राष्ट्रांमध्ये २००६ मध्ये दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांवरील अधिवेशन स्वीकारण्यात आलं.

जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याची आवश्यकता का आहे? : बहुतेक लोकांना माहित नाही की त्यांच्या परिसरात किती दिव्यांग नागरिक आहेत. त्यांना समाजात त्यांचे हक्क मिळत आहेत की नाही. चांगलं आरोग्य आणि स्वाभिमान मिळिवण्यासाठी त्यांना समाजातील इतर लोकांकडून मदतीची आवश्यकता असते. परंतु सहसा लोक असं करत नाहीत. सामान्य लोकांना दिव्यांग व्यक्तींच्या वास्तविक स्थितीबद्दल सांगण्यासाठी आणि जागरूक करण्यासाठी जागतिक दिव्यांग दिन साजरा केला जातो.

## संचार साथी ॲप मोबाईलमध्ये प्री-इन्स्टॉल नसणार; देशव्यापी फटकार बसताच केंद्र सरकारने यू टर्न घेत नाद सोडला!

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने मोबाईल फोनवर संचार साथी ॲपची प्री-इंस्टॉलेशन अनिवार्य करण्याचा निर्णय मागे घेतला आहे. दूरसंचार विभागाने सांगितले की, स्वेच्छेने ॲप डाउनलोड करणाऱ्या लोकांची संख्या फक्त एका दिवसात १० पट वाढली आहे. संचार साथी ॲपची वाढती लोकप्रियता पाहता, सरकारने मोबाइल फोन उत्पादकांसाठी प्री-इंस्टॉलेशनची अट काढून टाकली आहे. दरम्यान, केंद्र सरकारने बुधवारी लोकसभेत सांगितले की संचार साथी ॲपद्वारे हेरगिरी करणे शक्य नाही आणि हेरगिरी होणार नाही. केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काँग्रेस नेते दीपेंदर सिंह हुडा यांच्या ॲपबद्दलच्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की, मंत्रालय अभिप्रायाच्या आधारे ॲप इंस्टॉलेशन ऑर्डरमध्ये सुधारणा करण्यास तयार आहे. संचार साथी ॲपभोवतीचा संपूर्ण वाद २८ नोव्हेंबर रोजी सुरू झाला, जेव्हा दूरसंचार विभागाने (ऊ्ढ) सर्व मोबाइल फोन उत्पादकांना एक आदेश जारी केला, ज्यामध्ये कंपन्यांना भारतात विकल्या जाणाऱ्या सर्व नवीन मोबाइल फोनवर तसेच विद्यमान हँडसेटवर सॉफ्टवेअर अपडेटद्वारे ॲप इंस्टॉल करणे बंधनकारक केले गेले.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'दिलखुलास', 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात बार्टीचे महासंचालक सुनिल वारे यांची विशेष मुलाखत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' या विशेष कार्यक्रमांतर्गत 'महापरिनिर्वाण दिनानिमित्त - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व योगदान' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) महासंचालक सुनिल वारे यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत ६, ८ आणि ९ डिसेंबर २०२५ या रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर प्रसारित होईल. तसेच ही मुलाखत 'छ्शुी जप अखठ' या मोबाईल ॲपवरही उपलब्ध राहणार आहे. तर 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, ९ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर पाहता येईल. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत या समाजमाध्यमांवर देखील ही मुलाखत पाहता येणार आहे. निवेदक डॉ. मृण्मयी भजक यांनी ही मुलाखत घेतली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या न्याय, स्वातंर्त्य, समानता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था घडविण्यासाठी महाराष्ट्र शासन सातत्याने कार्यरत आहे. समाजातील वंचित घटकांना अंधश्रद्धा, जातीय-पंथीय भेदभाव, सांप्रदायिक द्वेष व असमानतेतून मुक्त करत वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक ऐक्य आणि समतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी शासनामार्फत विविध धोरणात्मक उपक्रम राबविले जातात. याच पार्श्र्वभूमीवर, 'महापरिनिर्वाण दिन' निमित्त, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुआयामी कार्य, विचारसंपदा आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदान या विषयावर महासंचालक वारे यांनी या कार्यक्रमातून सविस्तर माहिती दिली आहे. महासंचालनालयाच्या खालील अधिकृत समाजमाध्यमांवर देखील ही मुलाखत उपलब्ध होणार आहे.

## पुणेकरांसाठी खुशखबर! आता पुणे-अबू धाबी थेट विमान सेवा सुरू

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून हजारो प्रवासी दररोज प्रवास करत असतात. अशात आता प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. मंगळवार म्हणजेच २ डिसेंबरपासून पुण्याहून अबू धाबीसाठी थेट विमानसेवा सुरू झाली आहे. यामुळे पुणे विमानतळाच्या आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये अबू धाबी या चौथ्या प्रमुख शहराची भर पडली आहे. ज्यामुळे पुणेकरांना प्रवासाचा एक मोठा आणि महत्त्वाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.एअर इंडिया एक्सप्रेस या विमान कंपनीकडून ही नॉन-स्टॉप हवाई सेवा पुरविण्यात येणार आहे. ही सेवा आठवड्यातून तीन दिवस उपलब्ध असेल - मंगळवार, गुरुवार आणि शनिवार. पुण्याहून रात्री ९ वाजून १० मिनिटांनी हे विमान अबू धाबीसाठी उड्डाण करेल. डिसेंबर महिन्यात जर तुम्ही पुण्याहून अबू धाबीला प्रवास करण्याचा विचार करत असाल, तर २७ डिसेंबरपर्यंत तुम्ही १५ ते २५ हजार रूपयांच्या तिकीट खर्चामध्ये हा प्रवास करू शकता.

## नगरपरिषद निवडणुकीचे मतदान संपताच ईव्हीएम मशीनचे सील तोडले? गोंदियातील स्ट्राँग रुममध्ये नक्की काय घडले?

**दैनिक आपला विदर्भ**

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा नगरपंचायतीचे मतदान पूर्ण झाल्यानंतर सर्व मशीन उमेदवार आणि प्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये ऑन ऑफ आणि सीलकरून स्ट्राँगरूममध्ये नेण्यासाठी तहसील कार्यालय येथे नेण्यात आल्या. परंतु तहसील कार्यालयामध्ये सदर मशीन १७ प्रभागातील ईव्हीएम मशीन सील तोडून पुन्हा ऑन करण्यात आल्याचा आरोप स्थानिक उमेदवारांनी केलाय. त्यामुळे गोंदियात एकच गोंधळ उडाला. कोणतीही पूर्व सूचना उमेदवाराला आणि कोणत्याही प्रतिनिधीला देण्यात आली नाही. अशा प्रकारे ईव्हीएम मशीनचे सील तोडून त्यांच्या छेडखानी तर करण्यात आली नाही ना? असा संशय आता उमेदवारांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, सालेकसा नगरपंचायतीमध्ये सध्या एकच गोंधळ निर्माण झालाय. त्यामुळे सालेकसा तहसील कार्यालय परिसरात सध्या तणावपूर्ण वातावरण आहे. याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका कांबळे यांनी सांगितलं की स्वीच ऑन ऑफ आहे की नाही. हे आम्ही कंट्रोल युनिट पाहिलं आणि याची व्हिडिओ रेकॉर्डिंग आहे. अशी त्यांनी प्रतिक्रिया संबंधित व्यक्तींना दिलीय.

भंडारा जिल्ह्यातील तुमसर नगर परिषद निवडणुकीदरम्यान प्रभाग क्रमांक तीन मधील बुधनंबर ३ येथे असलेल्या मालवी शाळेतील मतदान केंद्रावर मतदारांना मतदानापासून वंचित ठेवल्याचा आरोप मतदारांनी केला आहे. यामुळं काहीकाळ मतदान केंद्रावर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचे बघायला मिळाले. दरम्यान कुठलीही अनुचित घटना घडू नये, यासाठी मतदान केंद्रावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अनेक मतदार




दुपारपासून मतदान केंद्रावर पोहचले असतानाही, त्यांना सायंकाळपर्यत मतदानापासून वंचित राहावे लागले आहे. यामुळं संतप्त झालेल्या नागरिकांनी मतदान केंद्राजवळ जोरदार घोषणाबाजी करून संताप व्यक्त केला. परिस्थिती नियंत्रणात राहावी, यासाठी पोलिसांचा अतिरिक्त फौजफाटा केंद्रावर तैनात करण्यात आला. मात्र या प्रकरणामुळे पुन्हा एकदा आरोप प्रत्यारोप केले जात आहे.

परळी नगर परिषदेच्या इमारतीमध्ये नगरपरिषदांच्या मतदानानंतर ईव्हीएम मशीन ठेवण्याकरता स्ट्राँग रूम करण्यात आली आहे. या ठिकाणी एसआरपीएफ आणि पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. असे असतानाही या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या देशमुख यांचे पती दीपक देशमुख यांनी प्रतिनिधी म्हणून भेट दिली. न्यायालयाच्या भूमिकेनंतर निकालासाठी १७ दिवस लागणार असल्याने मतपेट्यांसोबत छेडछाड होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.यावेळी त्यांनी आम्हाला इथे राहण्याची परवानगी देण्याची अजब मागणी केल्याचे पाहायला मिळाले.